मुंबईत २३० नवे रुग्ण, तिघांचा मृत्यू

मुंबई : मुंबईत शुक्रवारी एका दिवसात २३० नवीन रुग्णांची नोंद झाली, तर तीन रुग्णांचा मृत्यू झाला. मुंबईतील दैनंदिन रुग्णांची संख्या कमी होत असून उपचाराधीन रुग्णाची संख्याही कमीकमी होऊ लागली आहे. महिनाभरापूर्वी पाच हजाराच्यापुढे असलेली उपचाराधीन रुग्णसंख्या आता अडीच हजाराच्या आत आहे. शुक्रवारी २३० नवे रुग्ण आढळल्यामुळे एकूण बाधितांची संख्या ७ लाख ६२ हजारापुढे गेली आहे, तर एका दिवसात २४८ रुग्ण बरे होऊन घरी गेले. आतापर्यंत ७ लाख ४० हजाराहून अधिक म्हणजेच ९७ टक्के रुग्ण करोनामुक्त झाले आहेत. मृतांची संख्याही स्थिर असून शुक्रवारी तीन रुग्णांच्या मृत्यूची नोंद झाली. दोन रुग्णांचे वय ६० वर्षांवर होते. तर एका रुग्णाचे वय ४० ते ६० च्या दरम्यान होते.

राज्यात ८५२ नवे बाधित

राज्यात दिवसभरात करोनाच्या ८५२ नव्या रुग्णांची नोंद झाली तर ३४ जणांचा मृत्यू झाला. उपचाराधीन रुग्णांची संख्याही घटली आहे. गेल्या २४ तासात ठाणे जिल्हा १२०, नगर जिल्हा ७१, पुणे जिल्हा २३१, सातारा जिल्हा २१ नव्या रुग्णांची नोंद झाली. राज्यात ८,१०६ रुग्ण उपचाराधीन आहेत. मुंबईत २३४३, ठाणे जिल्हा १०५०, पुणे जिल्हा २०७७ रुग्ण उपचाराधीन आहेत.

परदेशातून येणाऱ्यांच्या चाचण्यांवर भर देण्याचे केंद्राचे आदेश

देशभर सतर्कतेचा इशारा

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : दक्षिण आफ्रिकेत आढळलेल्या करोनाच्या ‘बी.१.१५२९’ या नव्या उत्परिवर्तित विषाणूच्या पार्श्वभूमीवर परदेशातून येणाऱ्या प्रवाशांच्या चाचण्यांवर विशेष भर देण्याचे आदेश राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्राने सर्व राज्यांना दिले आहेत. नव्या विषाणूमुळे भीतीचे कारण नाही, परंतु सतर्कता आवश्यकता असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

नव्या विषाणूचे आत्तापर्यंत ७७ रुग्ण आढळले असून यातील बहुतांश रुग्ण दक्षिण आफ्रिकेमध्ये, तर चार बोटस्वाना आणि दोन हाँगकाँगमध्ये आढळले आहेत. डेल्टा किंवा आत्तापर्यंत आढळलेल्या करोना विषाणूच्या काटेरी प्रथिनामध्ये दोन ते तीन प्रकारचे उत्परिर्वतन झाले होते. परंतु या नव्या रूपामध्ये ३२ प्रकारचे उत्परिवर्तन झाल्याचे आढळले आहे. त्यामुळे हा विषाणू आत्तापर्यंतच्या विषाणूच्या तुलनेत वेगाने पसरणारा असून तीव्रतेने रोगप्रतिकारक शक्तीवर आक्रमण करणारा असल्याचे आढळले आहे.

सध्या जगभरात फैलावलेल्या डेल्टापेक्षाही तो घातक ठरू शकतो, त्यामुळे जगभरातील वैज्ञानिकांनी धोक्याचा इशारा दिला आहे. सध्या तरी तीन देशांमध्येच हा विषाणू आढळला असून घाबरण्याचे कारण नाही. परंतु सर्तकता बाळगणे गरजेचे आहे, असे मत करोना कृती दलाचे सदस्य डॉ. शशांक जोशी यांनी व्यक्त केले.

युरोपमध्ये सध्या वाढती रुग्णसंख्या आणि मृत्यूदर यामुळे चिंताजनक स्थिती निर्माण झाली आहे. परंतु लसीकरण न झालेल्या भागांमध्येच हा परिणाम दिसत आहे. मागील दीड वर्षाचा अनुभव लक्षात घेता या काळात युरोपमध्ये करोनाचा प्रादुर्भाव वाढतो. त्यामुळे सध्या लगेचच आपल्याकडे करोनाचा प्रसार वाढण्याची शक्यता नाही. त्यामुळे सध्या तातडीने निर्बंध लागू करण्याची आवश्यकता नाही. परंतु आपल्याकडे या नव्या विषाणूचा प्रवेश होऊ नये यासाठी सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे, कारण फेब्रुवारी किंवा मार्चमध्ये आपल्याकडे तिसरी लाट येण्याची शक्यता आहे, असे मृत्यू विश्लेषण समितीचे प्रमुख डॉ. अविनाश सुपे यांनी सांगितले.



परदेशी प्रवाशांवर लक्ष ठेवण्याच्या राज्यांना सूचना

विषाणूचे उत्परिवर्तित रूप आढळल्यानंतर परदेशातून विशेषतः दक्षिण आफ्रिका, बोटस्वाना आणि हाँगकाँगमधील प्रवाशांच्या करोना चाचण्या आणि तपासण्या बारकाईने करण्याचे आदेश सर्व राज्यांना दिले आहेत. तसेच वेळोवेळी केल्या जाणाऱ्या जनुकीय क्रमनिर्धारण (जिनोम सिक्वेन्सिंग) चाचण्यांवरही बारकाईने लक्ष ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत. या सोबरोबरच याआधी झालेल्या जिनोम सिक्वेन्सिंग चाचण्यांमध्ये मिळतेजुळते विषाणूचे रुप आढळले आहे का याचीही फेरतपासणी करण्याचे आदेश दिले आहेत. जागतिक आरोग्य संघटनेची यासंबंधी बैठक सुरू आहे. संघटनेने सांगितलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांची अंमलबजावणीही केली जाईल. त्यामुळे सर्व बाबींवर आपण देखरेख ठेवत आहोत, असे राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्राचे संचालक डॉ. सुजित सिंग यांनी ‘लोकसत्ता’शी बोलताना सांगितले.

मुखपट्टीचा योग्य वापर आवश्यक

करोना प्रसाराची साखळी तोडण्यासाठी आणि नव्या उत्परिवर्तित विषाणूचा उद्रेक होऊ नये यासाठी करोना प्रतिबंधात्मक नियमांचे पालन काटेकोरपणे करणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारचा विषाणू आला तरी मुखपट्टीचा योग्य वापर केल्यास निश्चितच संरक्षण मिळते, असे डॉ. जोशी यांनी सांगितले.

... अन्यथा तिसरी लाट सौम्यच

नव्या विषाणूचा उद्रेक झाला नाही, तर संभाव्य तिसऱ्या लाटेची तीव्रता सौम्यच असणार आहे. परंतु या दृष्टीने रुग्णसंख्येवर लक्ष ठेवणे, चाचण्या आणि लसीकरण वाढविणे सध्या गरजेचे आहे, असे मत डॉ. सुपे यांनी व्यक्त केले.

विलगीकरण, चाचण्यांवर भर

मुंबई विमानतळावर तीन देशांमधून आलेल्या प्रवाशांच्या चाचण्यांवर विशेष लक्ष दिले जावे. तसेच या प्रवाशांना विलगीकरणात ठेवणे बंधनकारक करावे. जेणेकरून बाधित असल्यास वेळीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करता येतील. याशिवाय लसीकरण वेगाने पूर्ण करावे आणि करोना प्रतिबंधात्मक उपाय विशेषतः मुखपट्टीच्या वापरावर भर देणे गरजेचे आहे. या सर्व सूचना कृती दलाच्यावतीने राज्य सरकारला लवकरच केल्या जातील, असे डॉ. जोशी यांनी सांगितले.

परदेशामधून येणाऱ्या बाधितांच्या जनुकीय क्रमनिर्धारण चाचण्या

मुंबई महापालिकेचा निर्णय

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : युरोपीय देशांमध्ये करोनाचा उद्रेक वाढत असताना तेथून येणारे प्रवासी बाधित असल्याचे आढळल्यास त्यांच्या जनुकीय क्रमनिर्धारण चाचण्या (जिनोम सिक्वेन्सिंग) करण्याचा निर्णय मुंबई महापालिकेने घेतला आहे. तसेच या देशांमधील जिनोम सिक्वेन्सिंग अहवालही देण्याची मागणी करोना कृती दलाकडे केली आहे.

आगामी नाताळ सणाच्या पार्श्वभूमीवर परदेशातून अनेक नागरिक भारतात येण्याची शक्यता आहे. तसेच सध्या रशिया, ऑस्ट्रेलिया, बेल्जियम, जर्मनी या देशांमध्ये पुन्हा एकदा करोनाचा फैलाव वेगाने होत आहे. या देशांमध्ये करोनाचे नवा उत्परिवर्तित प्रकार आढळल्यास त्यावर देखरेख ठेवणे गरजेचे आहे. त्यामुळे सध्या तेथे आढळणाऱ्या करोना विषाणूच्या उत्परावर्तित रुपाची माहिती मिळणे गरजेचे आहे. यासाठी या देशांमधील जनुकीय क्रमनिर्धारण अहवाल मागविण्याची मागणी पालिकेने राज्य करोना कृती दलाकडे केली आहे.

करोनाचा प्रादुर्भाव अधिक असलेल्या देशांमधून मुंबईत येणाऱ्या प्रवाशांना लागण झाली असेल किंवा विलगीकरण काळात बाधा झाल्याचे आढळल्यास त्यांचे नमुने जिनोम सिक्वेन्सिंगसाठी पाठविण्यात येणार आहेत. या नमुन्यांमध्ये करोनाचे नवे रूप असल्याचे आढळल्यास वेळीच सावध होता येईल. तसेच त्या देशांमधील ‘जिनोम सिक्वेन्सिंग’चे अहवाल असल्यास यांची तपासणी करणेही सोईचे होईल, असे पालिकेचे सहायक आयुक्त सुरेश काकाणी यांनी सांगितले.

दक्षिण आफ्रिकेमध्ये आढळलेल्या करोनाच्या नव्या परावर्तित रुपानंतर आपल्याकडे येणाऱ्या प्रवाशांमार्फत याचा प्रसार होऊ नये यासाठी आता दोन्ही मात्रा पूर्ण केलेल्या प्रवाशांच्याही मुंबईत उतरल्यावर चाचण्या कराव्यात का याचा विचार केला जात आहे. तसेच अन्य काही उपाययोजना करण्याबाबतही चर्चा सुरू आहे. आवश्यकता भासल्यास सध्याच्या चाचण्यांच्या नियमांमध्ये काही बदल करायचे असल्यास त्यानुसार केंद्रीय आरोग्य विभागाकडेही मागणी केली जाणार आहे, असे काकाणी यांनी सांगितले.

वेळीच खबरदारी

करोनाचा प्रादुर्भाव अधिक असलेल्या देशांमधून मुंबईत येणाऱ्या प्रवाशांना लागण झाली असेल किंवा विलगीकरण काळात बाधा झाल्याचे आढळल्यास त्यांचे नमुने जिनोम सिक्वेन्सिंगसाठी पाठविण्यात येणार आहेत. या नमुन्यांमध्ये नवा विषाणू आढळल्यास वेळीच सावध होता येईल.

९० टक्के ठाणेकरांमध्ये प्रतिपिंडे

सेरो सर्वेक्षणाचा अहवाल दिलासादायक

लोकसत्ता प्रतिनिधी

ठाणे : करोनाच्या संभाव्य तिसऱ्या लाटेची भीती व्यक्त केली जात असताना ठाणे महापालिका हद्दीत सेरो सर्वेक्षणाचा अहवाल दिलासादायक आहे. महापालिकेने केलेल्या सेरो सर्वेक्षणात ९०.४६ टक्के नागरिकांमध्ये करोना प्रतिपिंडे आढळली आहेत, अशी माहिती आयुक्त डॉ. विपीन शर्मा यांनी शुक्रवारी दिली. लस घेतल्यानंतरही सात टक्के नागरिकांमध्ये प्रतिपिंडे आढळून आलेली नाहीत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

ठाणे महापालिका क्षेत्रात १२ ते ३० ऑक्टोबर या कालावधीत महापालिका, सेरो एटीई चंद्रा फाऊंडेशन आणि आयडीएफसी संस्थेच्या माध्यमातून सेरो सर्वेक्षण करण्यात आले होते. या सर्वेक्षणामध्ये १,५७१ नागरिकांचे रक्ताचे नमुने घेण्यात आले होते. त्यापैकी १,४२४ म्हणजेच ९०.६४ टक्के नागरिकांमध्ये प्रतिपिंडे आढळून आली आहेत. ठाणे महापालिकेच्या माजिवडा- मानपाडा प्रभाग समितीमधील नागरिकांमध्ये प्रतिपिंडाचे प्रमाण कमी म्हणजेच ७९.२१ टक्के आहे. तर उथळसर येथील ९६.०७ टक्के नागरिकांमध्ये प्रतिपिंडे आढळून आली आहेत. मुंब्रा शहरातही ९२.१८ टक्के नागरिकांमध्ये प्रतिपिंडे तयार झाल्याचे आढळून आले.

अहवालात काय?

- इमारतींमध्ये राहणाऱ्या नागरिकांमध्ये ९३.३२ टक्के तर झोपडपट्टी परिसरातील नागरिकांमध्ये ८८.१२ टक्के प्रतिपिंडे तयार झाली आहेत.
- पुरुषांमध्ये ८९.६१ टक्के तर स्त्रियांमध्ये ९१.९१ टक्के प्रतिपिंडे आढळून आली आहेत.
- लसीकरणासाठी पात्र नसलेल्या ६ ते १७ वयोगटात ८३.४३ टक्के प्रतिपिंडे आढळून आली.
- ३१ ते ४५ वयोगटातील ९४.०३ टक्के नागरिकांमध्ये सर्वाधिक प्रतिपिंडे आढळून आली.

घोडबंदरमधील नागरिकांमध्ये प्रमाण कमी...

महापालिकेने घोडबंदर भागातील १७८ नागरिकांचे रक्ताचे नमुने गोळा केले. यापैकी १४१ जणांमध्ये म्हणजेच ७९.२१ टक्के नागरिकांमध्ये प्रतिपिंडे आढळून आली. प्रतिपिंडांचे प्रमाण जास्त असले तरी शहरातील इतर भागाच्या तुलनेत हे प्रमाण कमी आहे. या भागात ठाणे शहरातील इतर भागाच्या तुलनेत दाटीवाटीची वस्ती कमी आहे. करोना कालावधीत येथील बऱ्यापैकी नागरिक घरातूनच काम करत आहेत. इतर नागरिकांमध्ये सोबत त्यांचा संपर्क कमी आला, त्यामुळे इतर भागातील नागरिकांच्या तुलनेत येथील नागरिकांमध्ये प्रतिपिंडे तयार होण्याचे प्रमाण कमी असू शकते, असे अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे.

कोव्हिशिल्ड लशीची निर्यात पूर्ववत

पुणे : करोना प्रतिबंधक कोव्हिशिल्ड लशीचे जगातील प्रमुख उत्पादक असलेल्या पुण्यातील सीरम इन्स्टिट्यूटतर्फे कोव्हॅक्स गटातील देशांसाठी लशीची निर्यात पूर्ववत करण्यात आली आहे. शुक्रवारी सीरम इन्स्टिट्यूटने ही माहिती दिली.

अल्प आणि मध्यम उत्पन्न गटातील देशांच्या लसीकरणासाठी सीरमतर्फे लशींचा पहिला साठा शुक्रवारी रवाना करण्यात आला. सीरमने वर्षअखेरीस १०० कोटी लस मात्रांच्या निर्मितीचे उद्दिष्ट गाठले.

डिमांड नोटीस

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट), नियमावली, २००२ (नियम)च्या नियम ३(१) सह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (नमूद कायदा) च्या कलम १३(२) अंतर्गत नमूद नियमाच्या नियम ३ सह वाचल्या जाणाऱ्या नमूद कायद्याच्या कलम १३(१२) अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आयआयएफएल होम फायनान्स लि. (आयआयएफएल एचएफएल) (पूर्वी इंडिया इन्फोलाइन हाऊसिंग फायनान्स लि.) च्या प्राधिकृत अधिकारी यांनी नमूद कायद्याच्या कलम १३(२) अंतर्गत कर्जदारांना संबंधित डिमांड नोटीसमध्ये नमूद करण्यात आलेल्या रकमेचा भरणा करण्यासाठी डिमांड नोटीस जारी करण्यात आल्या आहेत. वरीलच्या संदर्भात याद्वारे परत एकदा सूचना देण्यात येत आहे की, सदर सूचनेच्या प्रसिद्धीपासून ६० दिवसांच्या आत खाली नमूद रकमेचा नोटीसच्या दिनांकापासून भरणा होईपर्यंत त्यावरील व्याजासह भरणा करण्यात यावा. कर्जदार(रां)चा, डिमांड नोटीसनुसार देय रकमेचा आणि कर्जाच्या रकमेच्या परताव्यासाठी देण्यात आलेल्या हमीचा तपशील खालीलप्रमाणे :–

कर्जदार(रां)/ हमीदार(रां) चे नाव	डिमांड नोटीस दिनांक आणि वेळ	सुरक्षित संपत्तीचे वर्णन (स्थावर मालमत्ता)
श्री. श्रावण भिकाजी कांबळे, श्रीमती आशा श्रावण कांबळे **(प्रॉस्पेक्ट क्र. आयएल१०१२८१७५)**	**२४–नोव्हेंबर–२०२१** रु.१६,३२,८५४/– (रुपये सोळा लक्ष बत्तीस हजार आठशे चोपन्न मात्र)	मालमत्तेचा धारण केलेला सर्व खंड आणि भूखंड: सदनिका क्र. ४०४, मोजमाप ३०२ चौ. फू., ४था मजला, वृंदावन आर्केड, बोपेले, नेरळ पश्चिम, तालुका कर्जत, रायगड, ठाणे, महाराष्ट्र, भारत ४२११०१
श्री. अशोक रमेश चव्हाण, श्रीमती अनिता अशोक चव्हाण **(प्रॉस्पेक्ट क्र. ८०१८७५)**	**२४–नोव्हें.–२०२१** रु.१३,८०,८६३/– (रुपये तेरा लक्ष ऐंशी हजार आठशे त्रेसष्ट मात्र)	मालमत्तेचा धारण केलेला सर्व खंड आणि भूखंड: सदनिका क्र. ४०४, मोजमाप २८५ चौ. फू., ४था मजला, इमारत क्र. ७, आम्ब्रोसिया इमारत– ७, एस क्र. ४०३/१, ४०३/१/बी, माहिम रोड, पालघर पश्चिम, पालघर ४०१५०१, महाराष्ट्र, भारत.

जर नमूद कर्जदार हे आयआयएफएल एचएफएलकडे वरीलप्रमाणे भरणा करू न शकल्यास आयआयएफएल एचएफएल वरील मालमत्तांवर नमूद कायद्याच्या कलम १३ (४) आणि लागू असलेल्या नियमांच्या अंतर्गत कारवाई करतील आणि त्याची संपूर्ण जबाबदारी नमूद कर्जदाराची असेल. अधिक माहितीसाठी कृपया प्राधिकृत अधिकारी यांच्याशी संपर्क करा: **शाखा कार्यालय**:– आयआयएफएल एचएफएल, आयआयएफएल हाऊस सन इन्फोटेक पार्क, रोड क्र. १६ व्ही, प्लॉट क्र. बी–३, ठाणे इंडस्ट्रियल एरिया, वागळे इस्टेट, ठाणे ४०००६४ आणि दुकान नं. २०१, दि एज, २रा मजला, प्रकाश टॉकीजमागे, आयसीआयसीआय बँकजवळ, पालघर (प.) ४०१४०४/ किंवा **कॉर्पोरेट कार्यालय**: आयआयएफएल टॉवर, प्लॉट क्र. ९८, उद्योग विहार, फेज IV, गुरगाव, हरयाणा.

ठिकाण: ठाणे आणि पालघर, दिनांक: २७.११.२०२१ **सही/– प्राधिकृत अधिकारी, आयआयएफएल होम फायनान्स लि.**

ताब्यात घेतल्याची सूचना (स्थावर मालमत्तेसाठी) नियम ८-(१)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे आयआयएफएल होम फायनान्स लिमिटेड (जुने नाव इंडिया इन्फोलाइन हाऊसिंग फायनान्स लि.) [आयआयएफएल-एचएफएल] यांचे प्राधिकृत अधिकारी आहेत आणि त्यांनी सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्स ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी ॲक्ट २००२, या कायद्यानुसार आणि त्यातील कलम १३(१२), ज्याचे सहवाचक (सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट) रुल्स २००२ यातील नियम क्र. ३ सोबत केले जाते, त्यानुसार प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, प्राधिकृत अधिकारी यांनी येथे खाली नमूद केलेले कर्जदार/सह-कर्जदार यांना एक डिमांड नोटीस जारी केली होती आणि त्या डिमांड नोटीसमध्ये नमूद केलेली रक्कम, नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत भरण्यास बजावले होते. सदर कर्जदारांनी या रकमेची परतफेड केलेली नाही. त्यामुळे याद्वारे सदर कर्जदार यांचा तसेच सर्व जनतेला याद्वारे कळविण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांना या कायद्याचे कलम १३(४), ज्याचे सहवाचन उपरोक्त नियमावलीतील नियम ०८ सोबत केले जाते; त्यानुसार प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून निम्नस्वाक्षरीकारांनी येथे खाली वर्णन केलेल्या मालमत्तांचा ताबा घेतला आहे. म्हणून त्याद्वारे विशेषकरून सदर कर्जदारांना आणि सर्व जनतेला सावध करण्यात येते की, या मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नयेत आणि यासंबंधी केलेले कोणतेही व्यवहार हे आयआयएफएल एचएफएल यांची नमूद केलेल्या आकाराची रक्कम आणि त्यावरील व्याज यांच्या अधीन असतील.

सदर कर्जदाराचे लक्ष या कायद्याचे कलम १३ यातील उपकलम (८) यातील तरतुदींकडे वेधण्यात येते. जर सदर कर्जदारांनी विक्री किंवा हस्तांतरण यासाठी निश्चित केलेल्या तारखेपूर्वी कोणत्याही वेळी आयआयएफएल-एचएफएल यांची देय असलेली संपूर्ण रक्कम तिच्यासंबंधी केलेले सर्व खर्च, व्यय आणि आकार यांच्यासह भरा. **‘‘आयआयएफएल-एचएफएल’’** या प्रतिभूत मत्तांची विक्री किंवा हस्तांतरण करणार नाही आणि प्रतिभूत मत्तांचे हस्तांतरण किंवा विक्री यासाठी पुढे कोणतीही पावले उचलण्यात येणार नाही.

कर्जदाराचे नाव ठाणे/पालघर शाखा	प्रतिभूत मत्तांचे वर्णन (स्थावर मालमत्ता)	एकूण थकीत रक्कम (रु.)	डिमांड नोटीसची तारीख	ताब्यात घ्यायची तारीख
सौ. अश्विनी तुषार दौंड आणि श्री. तुषार अंकुश दौंड **(प्रॉस्पेक्ट क्र. ८५०२१३)**	पुढील भाग आणि तेथील सर्व काही फ्लॅट नं. ००५, तळमजला, विंग ‘बी’, ‘दिव्य ज्योती’ नावाच्या इमारतीमध्ये ‘दिव्यराज व्हॅल्यू होम्स’ येथे क्षेत्रफळ मापन- १६.०९ चौ.मीटर्स यामध्ये जोडलेली बाल्कनी/टेरेस/वऱ्हांडा- क्षेत्रफळ ०२.५९ चौ.मी. एस. नं. १७१, पाम टेंभी, बोईसर पश्चिम, पालघर ४०१५०१, महाराष्ट्र, भारत.	**रु. ८,३५,३८८/-** (रुपये आठ लाख पस्तीस हजार तीनशे अठ्ठ्याऐंशी मात्र)	१० ऑगस्ट २०२१	२३ नोव्हेंबर २०२१
श्री. महेंद्र श्रीपत महाडकर आणि श्रीमती मीना एम. महाडकर **(प्रॉस्पेक्ट क्र. ८१७३५८)**	पुढील फ्लॅटचा सर्व भाग आणि तेथील सर्व काही :- फ्लॅट नं. ४०२, इमारत क्र. ०९, क्षेत्रफळ- २३७.०२ चौ.फूट. राठी ओशो धारा पार्क ‘चार्म्स मेडोज’जवळ आसनगाव रेल्वे स्टेशनच्या लगत, आसनगाव (पूर्व), तालुका ठाणे ४२१३०१, महाराष्ट्र, भारत.	**रु. १५,४६,२२६/-** (रुपये पंधरा लाख शेहेचाळीस हजार दोनशे सव्वीस मात्र)	२४ ऑगस्ट २०२१	२५ नोव्हेंबर २०२१

अधिक माहितीसाठी कृपया प्राधिकृत अधिकारी यांच्याशी शाखा कार्यालयामध्ये संपर्क करावा. पत्ता : शॉप नं. २०१, दि एज, दुसरा मजला, प्रकाश टॉकीजच्या मागे, आयसीआयसीआय बँकेच्या नजीक, पालघर (पश्चिम) ४०१४०४ आणि आयआयएफएल हाऊस, सन इन्फोटेक, पार्क रोड नं. १६(v), प्लॉट नं. बी-२३, ठाणे औद्योगिक वसाहत, वागळे इस्टेट, ठाणे-४००६०४/किंवा कॉर्पोरेट कार्यालय : प्लॉट क्र. ९८, फेज-IV, उद्योग विहार, गुरगाव, हरयाणा.

स्थळ : ठाणे आणि पालघर दिनांक : २७.११.२०२१ **सही/- प्राधिकृत अधिकारी, आयआयएफएल होम फायनान्स लिमिटेडकरिता**

ईओआय : मुंबई येथील आयएनएचएस अस्विनीच्या वैद्यकीय भांडाराकरिता औषधे व अधिसूचित वैद्यकीय उपकरणे व उपभोग्य सामग्रीच्या पुरवठ्याकरिता विक्रेत्यांची नोंदणी

फार्मास्युटिकल उत्पादने/वैद्यकीय उपभोग्य सामग्री/वैद्यकीय गॅसेस/वैद्यकीय उपकरणांकरिता पुरवठाकार म्हणून व्हेंडर डेटाबेसमधील अंतर्भूत मूळ कारखानदार/अधिकृत स्टॉकिस्ट्स/विक्रेते/ एजन्ट्स/वितरकांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत.

पुष्ठ्यर्थ कागदपत्रांसह अर्ज **www.defproc.gov.in** यावरून डाऊनलोड करता येतील. मागील वर्षांच्या कालावधीदरम्यान विद्यमान विक्रेत्यांची कार्यसिद्धी व्हेंडर डेटाबेसमधील समावेशाकरिता विचारात घेण्यात येईल. सर्व बाबतीत यथोचितरीत्या पूर्ण असलेले सर्व पुष्ठ्यर्थ कागदपत्रांच्या इंक–स्वाक्षरीकृत/ साक्षांकित सत्यप्रतींसमवेत अर्ज प्रपत्र मेडिकल स्टोअर्स, आयएनएचएस अस्विनी, आरसी चर्चजवळ, कुलाबा, मुंबई–४०० ००५ येथील कार्यालयात ठेवलेल्या **"व्हेंडर डेटाबेस"** म्हणून लेबल लावलेल्या कोटेशन बॉक्समध्ये जमा करावयाचे आहे. सर्व कागदपत्रांच्या स्कॅन्ड प्रती **oic-medicalstores@navy.gov.in** यावरून ईमेलद्वारा पाठवावयाच्या आहेत. सादरीकरणाची शेवटची तारीख ही जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून २१ दिवसांच्या आत आहे. **अपूर्ण अर्ज संबंधितांना कोणतीही पुढील सूचना न देता तडकाफडकी नामंजूर केले जातील. प्रतिनिधी/तारखेच्या विस्ताराकरिता विनंती विचारात घेतली जाणार नाही. तपशील www.defproc.gov.in यावरसुद्धा उपलब्ध आहे. कोणत्याही शंकेकरिता संपर्क व्यक्तींचा तपशील खालीलप्रमाणे आहे :– ओआयसी टेंडर सेक्शन (मेडिकल स्टोअर्स), फोन : ०२२–२२१४३७५०.**

डीएव्हीपी १०७०२/११/००५८/२१२२

ICICI Lombard
Nibhaye Vaade

आयसीआयसीआय लोम्बार्ड जनरल इंश्युरन्स कंपनी लिमिटेड
(CIN: L67200MH2000PLC129408)
नोंदणीकृत कार्यालय: आयसीआयसीआय लोम्बार्ड हाऊस, ४१४, वीर सावरकर मार्ग, सिद्धिविनायक मंदिराजवळ, प्रभादेवी, मुंबई – ४०० ०२५
दू.: ०२२–६१९६११००, **फॅक्स:** ०२२–६१९६१३२३
संकेतस्थळ: www.icicilombard.com **ई-मेल:** customersupport@icicilombard.com

जाहीर सूचना

आयसीआयसीआय लोम्बार्ड जनरल इंश्युरन्स कंपनी लि. (‘‘आयसीआयसीआय लोम्बार्ड’’) सोबतच्या भारती एएक्सए जनरल इंश्युरन्स कंपनी लि. (‘‘भारती एएक्सए’’) च्या जनरल इंश्युरन्स व्यवसायाचे विलगीकरण

पॉलिसीधारक आणि समस्त जनतेला याद्वारे कळविण्यात येते की, इंश्युरन्स रेग्यूलेटरी ॲण्ड डेव्हलमेंट ऑथरीटी ऑफ इंडियाच्या (‘‘**आयआरडीएआय**’’) द्वारे त्यांच्या ०३ सप्टेंबर, २०२१ दिनांकित पत्रव्यवहारान्वये, ०८ सप्टेंबर, २०२१ पासून (‘‘**प्रभावी दिनांक**’’) भारती एएक्सएच्या जनरल इंश्युरन्स व्यवसायाचे आयसीआयसीआय लोम्बार्डकडे विलगीकरण करण्यात आला होता.

विलगीकरणाची प्रक्रिया पुर्ण झाली आहे आणि भारती एएक्सए द्वारे वितरीत सर्व पॉलिसीज (त्या अंतर्गतच्या दायित्वासोबत) आयसीआयसीआय लोम्बार्डकडे हस्तांतरीत झाल्या आहेत आणि अशा पॉलिसीज प्रभावि तारखेपासून आयसीआयसीआय लोम्बार्डद्वारे सेवा पुरवण्यात येतील. सदर व्यवहाराद्वारे अर्थपूर्ण महसूल आणि ऑपरेशनल समन्वयाद्वारे सर्व भागधारकांसाठी मूल्य निर्मिती करणे अपेक्षित आहे. या व्यतिरिक्त पॉलिसीधारकांना वर्धित उत्पादन संच आणि सखोल ग्राहक कनेक्ट टच पॉइंट्सचा फायदा होईल. एकत्रित व्यवसायातील कर्मचाऱ्यांना कार्यक्षेत्र आणि भौगोलिक क्षेत्रांमध्ये मोठ्या संधींद्वारे देखील फायदा होईल

आम्ही या नवीन प्रवासात वाटचाल करत असताना, तुम्हाला आश्वासन देतो की आम्ही वचनबद्ध आहोत आयसीआयसीआय लोम्बार्डच्या तत्त्वांना, ज्यांनी आयसीआयसीआय लोम्बार्डला तुमची विश्वासू विमा कंपनी बनवले आहे. आम्ही तुम्हाला याची देखील खात्री देतो

अ. तुमच्या पॉलिसीच्या अटी व शर्ती तुमच्या विद्यमान पॉलिसी दस्तावेजांप्रमाणेच राहतील.
ब. विद्यमान अटी आणि शर्तींनुसार पॉलिसी नुतनीकरणावर तुमच्यासाठी सातत्य लाभ उपलब्ध असतील.
क. तुमच्या पॉलिसीच्या संदर्भातील विद्यमान दावा संबंधीत लाभ अखंडीत राहतील. सर्व दावे तुमच्या विद्यमान पॉलिसीच्या अटी व शर्ती अनुसार (प्रलंबीत दावे समाविष्ट) स्वीकारण्यात येतील.
ड. आमच्याकडे नोंदविण्यात आलेल्या तक्रारी आणि भारती एएक्सए विरूध्द नोंदविण्यात आलेल्या तक्रारींचा निपटारा आयसीआयसीआय लोम्बार्डद्वारे करण्यात येईल.

तुम्हाला या संदर्भात आवश्यक असलेली अधिक माहिती देण्यास आम्हाला आनंद होईल. व्यवहार संबंधीत पॉलिसीधारक किंवा अन्य हितधारकांना असलेल्या सर्वसाधारण विचारांना संबोधीत करण्यासाठी आम्ही संकेतस्थळ www.icicilombard.com वर वारंवार विचारण्यात येणाऱ्या प्रश्नांची यादी तयार ठेवली आहे.

तुम्हाला पॉलिसी विषयक कोणतीही माहिती हवी असल्यास, कृपया १८००–१०३–२२९२ वर संपर्क करा किंवा आम्हाला **customersupportba@icicilombard.com** वर ईमेल करा.

आयसीआयसीआय लोम्बार्ड जनरल इंश्युरन्स कंपनी लिमिटेड करीता
हस्ता/–
विकास मेहरा
कंपनी सचिव
एसीएस क्र. १२११७

मुंबई
२६ नोव्हेंबर, २०२१

उपरोक्त प्रदर्शित आयसीआयसीआय ट्रेड लोगो हा आयसीआयसीआय बँकेच्या मालकीचा आहे आणि अनुज्ञप्ती अंतर्गत आयसीआयसीआय लोम्बार्ड जीआयसी लि. द्वारे वापरण्यात आला आहे आणि लोम्बार्ड लोगो हा आयसीआयसीआय लोम्बार्ड जीआयसी लि.,च्या मालकीचा आहे. आयसीआयसीआय लोम्बार्ड जनरल इंश्युरन्स कंपनी लिमिटेड, आयसीआयसीआय लोम्बार्ड हाऊस, ४१४, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई–४०० ०२५. आयआरडीए नोंद. क्र. ११५, टोल मुक्त क्र. १८०० २६६६. फॅक्स क्र.: ०२२–६१९६१३२३. CIN (L67200MH2000PLC129408). customersupport@icicilombard.com. www.icicilombard.com.

pnb Housing
Finance Limited

नोंदणीकृत कार्यालय: ९ वा मजला, अंत्रिक्ष भवन, २२, के. जी. मार्ग, नवी दिल्ली-११०००१.
फोन: ०११-२३७०५४१४, वेबसाइट: www.pnbhousing.com

मुंबई शाखा: २०३, दुसरा मजला, वेस्टर्न एज I, मागाठाणे, बोरिवली (पू.), मुंबई–४०००६६

परिशिष्ट-IV-ए
[नियम ९(१)च्या तरतुदी पाहा]

स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता सूचना

[सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या (नियम ९(१)च्या तरतुदी वाचलेल्या वित्तीय मत्तेची सुरक्षितता आणि पुनर्रचना आणि सुरक्षा हित कायदा २००२च्या अंमलबजावणीअंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई–लिलाव विक्री सूचना]

लोन अकाऊंट नं.: डब्ल्यूएफएच/सीसीएफ/0१17/४२७१३१ व डब्ल्यूएफएच/सीसीएफ/0१17/४२७१४१

आम जनतेस आणि विशेषकरून ऋणको, सुरक्षा पुरवठाकार/ गहाणकार व हमीदारांना याद्वारा सूचना देण्यात येते की, सुरक्षित धनको **म्हणजेच पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेडकडे गहाण असलेल्या/ गहाणवट असलेल्या याखाली वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा विधायक ताबा सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकारींनी ११ जून, २०२० रोजी घेतला आहे. सदर मालमत्तेची विक्री मेसर्स ऐश्वर्या अवंत बिल्डर्स एलएलपी, मेसर्स अवंत व्हेंचर्स एलएलपी, मेसर्स अवंत इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड, श्री. सुदीप कुमार साहा व श्री. हरीश रजनीकांत शाह यांच्याकडील २० ऑक्टोबर, २०२१ रोजीप्रमाणे सुरक्षित धनकोंकरिता नमूद केलेल्या कर्ज सुविधा देणीसंबंधित आयएनआर रु.१२,४१,५६,७४४.५१/– (भारतीय रुपये बारा कोटी एकेचाळीस लाख छप्पन्न हजार सातशे चव्वेचाळीस व पैसे एकावन्न फक्त) या रकमेच्या वसुलीकरिता २८ डिसेंबर २०२१ रोजी स. ११.०० वा.पासून (प्रत्येकी ५ मिनिटांच्या विस्तारासह) ‘‘जसे आहे जेथे आहे’’, ‘‘जसे आहे जे काही आहे’’ आणि ‘‘जे काही आहे तेथे आहे’’ या तत्त्वावर करण्यात येणार आहे. राखीव किंमत स्थावर मालमत्तेकरिता आयएनआर १५,५८,५५,२९७.५०/– (भारतीय रुपये पंधरा कोटी अठ्ठावन्न लाख पंचावन्न हजार दोनशे सत्त्याण्णव व पैसे पन्नास फक्त) असेल. इसारा रक्कम ठेव आयएनआर १,५५,८५,५२९.७५/–(भारतीय रुपये एक कोटी पंचावन्न लाख पंच्याऐंशी हजार पाचशे एकोणतीस व पैसे पंचाहत्तर फक्त) असेल.**

स्थावर मालमत्ता

ऐश्वर्या अवंत फेज-II, म्हणजेच पुढील प्रकल्पाच्या जमिनीचे सर्व खंड व तुकडे समाविष्ट: ‘‘अवंत हेरिटेज फेज-II’’ मोजमापाचे १०५० चौ. मी. धारण केलेला सी.टी.एस. नं. १५६–डी व पुढील ठिकाणी स्थित असलेले त्यावरील सर्व सद्य व भावी स्ट्रक्चर्ससह एकत्रित- **व्हिलेज मजास, प्रतापनगर, जोगेश्वरी (पू.), मुंबई-४०००६० समाविष्ट २६ विक्री न झालेले युनिट्स आणि वगळता ९ विक्री झालेले युनिट्स ज्याकरिता एनओसी’ज आमच्याद्वारा निर्गमित करण्यात आली आहे (अद्ययावत उपलब्ध रेकॉर्ड्स व पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेडद्वारा निर्गमित केलेल्या एनओसी’जद्वारा).**

विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटी www.pnbhousing.com या पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या वेबसाइटवर अपलोड करण्यात आल्या आहेत.

ज्ञात भार

निम्नस्वाक्षरीकाराच्या मते त्यांना माहीत असल्यानुसार तेथे स्थावर मालमत्तेवर कोणताही भार नाही. भावी खरीददार/ बोलीदारांना विनंती करण्यात येते की, कोणत्याही अन्य भाराची निश्चित माहिती मिळवावी आणि स्थावर मालमत्तेसंबंधित त्यांनी स्वतः योग्य ती चौकशी करावी. जर तेथे अन्य कोणतेही भार असल्यास, सदर भाराचे यशस्वी खरीददार/ बोलीदार, त्याच्या/ तिच्याद्वारा प्रदान करावयाचे आहेत/ सोसावयाचे आहेत. भावी खरीददार/ बोलीदारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी स्वतंत्ररीत्या सदर भारांबाबत सत्यता पडताळून पाहावी.

स्वाक्षरी/–
विनोद पाल
प्राधिकृत अधिकारी
पीएनबी हाऊसिंग फायनान्स लि. करिता

तारीख: २५ नोव्हेंबर, २०२१
स्थळ: मुंबई

pnb Housing
Finance Limited

नोंदणीकृत कार्यालय: ९ वा मजला, अंत्रिक्ष भवन, २२, के. जी. मार्ग, नवी दिल्ली-११०००१.
फोन: ०११-२३७०५४१४, वेबसाइट: www.pnbhousing.com

मुंबई शाखा: २०३, दुसरा मजला, वेस्टर्न एज I, मागाठाणे, बोरिवली (पू.), मुंबई–४०००६६

परिशिष्ट-IV-ए
[नियम ९(१)च्या तरतुदी पाहा]

स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता सूचना

[सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या (नियम ९(१)च्या तरतुदी वाचलेल्या वित्तीय मत्तेची सुरक्षितता आणि पुनर्रचना आणि सुरक्षा हित कायदा २००२च्या अंमलबजावणीअंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई–लिलाव विक्री सूचना]

लोन अकाऊंट नं.: डब्ल्यूएफएच/सीसीएफ/0१17/४२७१३१ व डब्ल्यूएफएच/सीसीएफ/0१17/४२७१४१

आम जनतेस आणि विशेषकरून ऋणको, सुरक्षा पुरवठाकार/ गहाणकार व हमीदारांना याद्वारा सूचना देण्यात येते की, सुरक्षित धनको म्हणजेच पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेडकडे गहाण असलेल्या/ गहाणवट असलेल्या याखाली वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा विधायक ताबा सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकारींनी ११ जून, २०२० रोजी घेतला आहे. सदर मालमत्तेची विक्री मेसर्स ऐश्वर्या अवंत बिल्डर्स एलएलपी, मेसर्स अवंत व्हेंचर्स एलएलपी, मेसर्स अवंत इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड, श्री. सुदीप कुमार साहा व श्री. हरीश रजनीकांत शाह यांच्याकडील २० ऑक्टोबर, २०२१ रोजीप्रमाणे सुरक्षित धनकोंकरिता नमूद केलेल्या कर्ज सुविधा देणीसंबंधित आयएनआर रु.१२,४१,५६,७४४.५१/– (भारतीय रुपये बारा कोटी एकेचाळीस लाख छप्पन हजार सातशे चव्वेचाळीस व पैसे एकावन्न फक्त) या रकमेच्या वसुलीकरिता २८ डिसेंबर २०२१ रोजी स. ११.०० वा.पासून (प्रत्येकी ५ मिनिटांच्या विस्तारासह) ‘‘जसे आहे जेथे आहे’’, ‘‘जसे आहे जे काही आहे’’ आणि ‘‘जे काही आहे तेथे आहे’’ या तत्त्वावर करण्यात येणार आहे. स्थावर मालमत्तेकरिता राखीव किंमत आयएनआर १३,४५,५९,४४९.५०/– (भारतीय रुपये तेरा कोटी पंचेचाळीस लाख एकोणसाठ हजार चारशे एकोणपन्नास व पैसे पन्नास फक्त) असेल. इसारा रक्कम ठेव आयएनआर १,३४,५५,९४४.९५/–(भारतीय रुपये एक कोटी चौतीस लाख पंचावन्न हजार नऊशे चव्वेचाळीस व पैसे पंच्याण्णव फक्त) असेल.

स्थावर मालमत्ता

ऐश्वर्या अवंत फेज-I, म्हणजेच पुढील प्रकल्पाच्या जमिनीचे सर्व खंड व तुकडे समाविष्ट: ‘‘अवंत हेरिटेज फेज-I’’ मोजमापाचे २२१८ चौ. मी. धारण केलेला सी.टी.एस. नं. १५७, १५७/१ ते ५५, प्लॉट नं. २६ (पार्ट–१), सी.टी.एस. नं. १५८, १५८/१ ते ३३, प्लॉट नं. २५ (पार्ट–१), सी.टी.एस. नं. १९२(पार्ट), प्लॉट नं. २६ (पार्ट–१), पुढील ठिकाणी स्थित असलेले त्यावरील सर्व सद्य व भावी स्ट्रक्चर्ससह एकत्रित- व्हिलेज मजास, ता. अंधेरी, जोगेश्वरी (पू.), मुंबई–४०००६० समाविष्ट ९ विक्री न झालेले युनिट्स आणि वगळता १०२ विक्री झालेले युनिट्स ज्याकरिता एनओसी’ज आमच्याद्वारा निर्गमित करण्यात आली आहे (अद्ययावत उपलब्ध रेकॉर्ड्स व पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेडद्वारा निर्गमित केलेल्या एनओसी’जद्वारा).

विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटी www.pnbhousing.com या पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या वेबसाइटवर अपलोड करण्यात आल्या आहेत.

ज्ञात भार

निम्नस्वाक्षरीकाराच्या मते त्यांना माहीत असल्यानुसार तेथे स्थावर मालमत्तेवर कोणताही भार नाही. भावी खरीददार/ बोलीदारांना विनंती करण्यात येते की, कोणत्याही अन्य भाराची निश्चित माहिती मिळवावी आणि स्थावर मालमत्तेसंबंधित त्यांनी स्वतः योग्य ती चौकशी करावी. जर तेथे अन्य कोणतेही भार असल्यास, सदर भाराचे यशस्वी खरीददार/ बोलीदार, त्याच्या/ तिच्याद्वारा प्रदान करावयाचे आहेत/ सोसावयाचे आहेत. भावी खरीददार/ बोलीदारांना विनंती करण्यात येते की त्यांनी स्वतंत्ररीत्या सदर भारांबाबत सत्यता पडताळून पाहावी.

स्वाक्षरी/–
विनोद पाल
प्राधिकृत अधिकारी
पीएनबी हाऊसिंग फायनान्स लि. करिता

तारीख: २५ नोव्हेंबर, २०२१
स्थळ: मुंबई